ePaper


## महापुरानंतर भारत नेपाळला दररोज 18 तास देणार वीज



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 15 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

कचऱ्याच्या प्रश्नावर महापालिकेचा 'विकेंद्रित' उपाय

## 'ब्रिक्स' परिषदेत चीनकडून भारताला मोठा प्रस्ताव सादर

# चीनचा अमेरिकेला दणका!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**BRICS परिषदेत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी मोठा प्रस्ताव मांडला आहे. BRICS AI ओपन-सोर्स कम्युनिटी आणि डिजिटल इकोसिस्टम क्लाउड प्लॅटफॉर्म उभारण्याची कल्पना त्यांनी मांडली. या प्रस्तावामुळे AI क्षेत्रात अमेरिकेच्या वर्चस्वाला पर्याय निर्माण करण्याच्या चीनच्या प्रयत्नांची चर्चा सुरू झाली आहे.**




भारत दौऱ्यावर आलेल्या शी जिनपिंग आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात द्विपक्षीय बैठकही झाली. गलवान संघर्षानंतर भारत-चीन संबंध सुधारण्याच्या पार्श्वभूमीवर या बैठकीकडे विशेष लक्ष लागले होते. दोन्ही देशांमधील वाढते सहकार्य आणि BRICSमधील चीनच्या भूमिकेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे.

चीनकडून ओपन-सोर्स आणि ओपन-वेट AI मॉडेल्सना प्रोत्साहन दिले जात आहे. अमेरिकेतील बंदिस्त AI प्रणालींना पर्याय म्हणून चीनच्या AI तंत्रज्ञानाला पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. BRICSच्या माध्यमातून या सहकार्याला व्यापक स्वरूप देण्याचा चीनचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

मात्र, जिनपिंग यांनी मांडलेला AI प्रस्ताव BRICSच्या नवी दिल्लीतील घोषणापत्राचा भाग नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. २०२७ मध्ये BRICSचे आयोजन चीनकडे असताना या प्रस्तावाला पुढे नेण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता आहे.

AI क्षेत्रात भारताने कोणत्याही एका देशावर अवलंबून न राहता स्वतःची क्षमता विकसित करण्यावर भर दिला आहे. INDIAAI मिशनच्या माध्यमातून देशात कृत्रिम बुद्धिमत्तेची परिसंस्था मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे चीनच्या प्रस्तावाबाबत भारताची भूमिका स्वतंत्र राहण्याची शक्यता आहे.

BRICSच्या माध्यमातून चीन AI क्षेत्रातील सहकार्य वाढविण्याचा प्रयत्न करत असला तरी भारत चीनच्या या योजनेत सहभागी होणार की नाही, याबाबत अद्याप स्पष्ट निर्णय समोर आलेला नाही. त्यामुळे पुढील काळात भारत-चीन सहकार्य आणि अमेरिकेसोबतचे तंत्रज्ञानविषयक समीकरण याकडे जगाचे लक्ष राहणार आहे.

### 2027 मध्ये पुन्हा चर्चेची शक्यता

नवी दिल्लीतील BRICS घोषणापत्रात चीनचा AI प्रस्ताव समाविष्ट झालेला नाही. मात्र, 2027 मध्ये चीनकडे BRICSचे अध्यक्षपद असल्याने या प्रस्तावावर पुन्हा चर्चा होण्याची शक्यता आहे.

### शी जिनपिंग यांची भारतभेट चर्चेत

सुमारे सात वर्षांनंतर चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग भारतात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या द्विपक्षीय चर्चेमुळे भारत-चीन संबंधांसह BRICSमधील सहकार्यालाही नवे महत्त्व प्राप्त झाले.

### अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान

OPENAI, ANTHROPIC आणि GOOGLEसारख्या अमेरिकी कंपन्यांच्या प्रगत AI प्रणालींना पर्याय उभा करण्याच्या दिशेने चीनची वाटचाल सुरू आहे. BRICSच्या माध्यमातून ही स्पर्धा आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

### भारताची स्वतंत्र भूमिका

AI क्षेत्रात भारताने कोणत्याही एका देशावर अवलंबून न राहता स्वतःची क्षमता विकसित करण्यावर भर दिला आहे. INDIAAI मिशनच्या माध्यमातून देशात कृत्रिम बुद्धिमत्तेची परिसंस्था मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे चीनच्या प्रस्तावाबाबत भारताची भूमिका स्वतंत्र राहण्याची शक्यता आहे.

### चीनचा AI 'मास्टरप्लॅन'?

BRICSच्या माध्यमातून AI क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी चीनकडून ओपन-सोर्स कम्युनिटी आणि डिजिटल इकोसिस्टम क्लाउड प्लॅटफॉर्मचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. अमेरिकेच्या AI वर्चस्वाला पर्याय उभारण्याच्या चीनच्या प्रयत्नांचा हा भाग मानला जात आहे.

# ढोल-ताशांचा निनाद अन् ‘मोरया’चा गजर

## मानाच्या गणपतींची विधिवत प्रतिष्ठापना; पुण्यात गणेशोत्सवाचा श्रीगणेशा!

**महाईन्यूज । पुणे**

**ढोल-ताशांचा निनाद, भगवे ध्वज, बँडपथकांच्या सुरेल सुरावटी आणि ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषात सोमवारी पुण्यात गणेशोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली. मानाच्या गणपती मंडळांच्या गणरायांची विधिवत पूजा करून मुहूर्तावर प्रतिष्ठापना करण्यात आली. शहराच्या मध्यवर्ती भागात सकाळपासूनच गणेशभक्तांची मोठी गर्दी झाली होती. रात्री उशिरापर्यंत विविध मंडळांच्या प्रतिष्ठापना मिरवणुका सुरू होत्या.**



### मानाच्या गणपतींची उत्साहात प्रतिष्ठापना

कसबा, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग आणि केसरीवाडा या मानाच्या गणपतींच्या मिरवणुका उत्साहात पार पडल्या. ढोल-ताशा, बँडपथक आणि भगव्या ध्वजांमुळे मध्यवर्ती पुण्यात दिवसभर उत्सवी वातावरण पाहायला मिळाले.

गणेशमूर्तींचे रविवारीच आगमन झाल्यानंतर सोमवारी घरोघरी विधिवत पूजन करून प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर युवक-युवती ढोल-ताशा पथकांच्या वादनासाठी सज्ज झाले. ढोल, ताशा आणि झांजांच्या तालावर तरुणाईने उत्साहाचे वातावरण निर्माण केले. युवतींचाही वादनामध्ये मोठा सहभाग दिसून आला.

मानाचा पहिला श्री कसबा गणपती यांची मिरवणूक सकाळी सव्वाआठ वाजता सुरू झाली. चांदीच्या पालखीतून गणरायाचे आगमन झाले. प्रभात बँड, संघर्ष ढोल-ताशा, ज्ञानप्रबोधिनी युवक विभाग आणि शौर्य ढोल-ताशा पथक सहभागी झाले. त्यानंतर विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली.

मानाचा दुसरा श्री तांबडी जोगेश्वरी गणपती यांची मिरवणूक चांदीच्या पालखीतून काढण्यात आली. नगारावादन, ब्रास बँड, ढोल-ताशा आणि शंख पथकांनी सहभाग घेतला. मंडळाने यंदा तुळजाभवानी मंदिराची प्रतिकृती साकारली आहे.

मानाचा तिसरा श्री गुरुजी तालीम गणपती फुलांनी सजविलेल्या आकर्षक रथातून उत्सव मंडपात आणण्यात आला. विविध ढोल-ताशा पथके आणि ब्रास बँड सहभागी झाले. मानाचा चौथा श्री तुळशीबाग गणपती यांची मिरवणूकही मोठ्या उत्साहात पार पडली. तर मानाचा पाचवा केसरीवाडा गणपती पालखीतून मिरवणुकीने उत्सव मंडपात दाखल झाला.

अखिल मंडई मंडळाच्या शारदा-गजाननाची फुलांनी सजविलेल्या भव्य पुष्परथातून मिरवणूक काढण्यात आली. विविध बँड आणि ढोल-ताशा पथकांनी सहभाग घेतला. दरम्यान, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची मिरवणूकही मयूर रथातून उत्साहात काढण्यात आली. या मिरवणुकीत ढोल-ताशा आणि विविध बँडपथके सहभागी झाली.

यंदा गणेशोत्सव बारा दिवसांचा असल्याने पुणेकरांना गणरायाच्या भक्तीत रमण्याची अधिक संधी मिळणार आहे. प्रतिष्ठापना मिरवणुकांनी पुढील बारा दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाच्या जल्लोषाची नांदी केली आहे.

# ध्वनिवर्धकांच्या भिंतीऐवजी उभारल्या धान्याच्या भिंती!

**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सव म्हटला की मोठ्या आवाजातील ध्वनिवर्धकांची भिंत आणि विसर्जन मिरवणुकीतील चर्चा होत असताना, शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळाने उत्सवाला सामाजिक बांधिलकीची दिशा देत गरजू व निराधार कुटुंबांसाठी धान्याच्या भिंती उभारण्याचा आदर्श निर्माण केला आहे. उत्सवातील शक्ती केवळ जल्लोषासाठी न वापरता ती समाजाच्या उपयोगी यावी, या भावनेतून मंडळाच्या वतीने एक लाख रुपयांच्या किराणा साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. वर्षभर विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला काही तरी देण्याचा प्रयत्न मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून केला जातो.**



सेवा मित्र मंडळ येथे झालेल्या कार्यक्रमास आमदार हेमंत रासने, नगरसेवक राघवेंद्र मानकर, सौरभ वीरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक धनंजय पिंगळे, गणेश अवघडे, सामाजिक कार्यकर्ते आनंद सराफ, उमेश कांबळे, अशोक मेहेंदळे, शिरीष शिंदे, किरण सोनीवाल, अमित जाधव, अनिकेत मारणे, मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ महाडिक, शिरीष मोहिते, अमर लांडे, नमन कांबळे, विक्रांत मोहिते यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. मंडळाच्या वतीने पुरुष सदस्य नसलेल्या तसेच निराधार कुटुंबांना या उपक्रमातून मदत करण्यात येत आहे. यामध्ये मुस्लिम कुटुंबांसह रोजगारासाठी पुण्यात आलेल्या नेपाळी कुटुंबांचाही समावेश आहे.

रासने म्हणाले, ‘सेवा मित्र मंडळाने ध्वनिवर्धकांच्या भिंतींऐवजी गरजू कुटुंबांसाठी धान्याच्या भिंती उभारून समाजाप्रती असलेली बांधिलकी जपली आहे. गरजूंसाठी अशा पद्धतीने मदतीचा हात पुढे करणे हे मंडळाचे कार्य कौतुकास्पद आहे. ३६५ दिवस समाजाला काही तरी देणे लागतो, या भावनेने काम करणारे कार्यकर्ते हीच गणेशोत्सवाची खरी ताकद आहे. १३४ वर्षांची परंपरा असलेल्या या उत्सवाने अनेक समर्पित कार्यकर्ते घडविले असून, उत्सवाला दिशा देण्याचे काम त्यांनी केले आहे. एक दिवसाच्या विसर्जन मिरवणुकीमुळे वर्षभर हा उत्सव समाजाला कशा प्रकारे मदत करतो हे विसरता कामा नये.

विसर्जन मिरवणुकीसह उत्सवातील सर्व उपक्रमांमध्ये कायद्याचे पालन केले पाहिजे. गणेशोत्सव ही केवळ उत्सवाची परंपरा नसून एक चळवळ आहे आणि या चळवळीने संघटित शक्ती निर्माण केली आहे. या शक्तीचा उपयोग समाजासाठी करण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांची आहे.’

मोहिते म्हणाले, ‘सण-उत्सव साजरे करताना समाजातील उपेक्षित घटकांकडे मंडळाच्या वतीने आवर्जून लक्ष दिले जाते. उत्सव ताकदीने साजरा व्हावा, मात्र त्याचबरोबर त्यातून समाजोपयोगी संदेशही गेला पाहिजे. समाजातील गरजू कुटुंबांनाही सण आनंदाने साजरा करता यावा, हा या उपक्रमामागचा उद्देश आहे. गणेशोत्सव हा कोण्या एका धर्माचा उत्सव नसून त्यात मुस्लिम समाजासह विविध समाजघटकांचेही योगदान राहिले आहे. त्यामुळे हा उत्सव समाजाला जोडणारा आणि एकमेकांना आधार देणारा ठरला पाहिजे.’

# कचऱ्याच्या प्रश्नावर महापालिकेचा ‘विकेंद्रित’ उपाय

## शहरातील १० ठिकाणी जागा प्रस्तावित; अत्याधुनिक कचरा प्रक्रिया सुविधांवर भर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, शाश्वत आणि विकेंद्रित पद्धतीने करण्यासाठी महानगरपालिकेने विविध भागांतील जागा प्रस्तावित केल्या आहेत. मोशी कचरा डेपोवरील कचऱ्याचा वाढता भार लक्षात घेता, प्रभाग स्तरावर घनकचरा व्यवस्थापनाची यंत्रणा सक्षम करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.**

मोशी कचरा डेपो येथे घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध जागा अपुरी पडत असल्याने शहरातील विविध भागांतून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रभागनिहाय विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या आरक्षित जागांची स्थळपाहणी करण्यात आली असून, प्राथमिक स्तरावर काही जागा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

प्रस्तावित जागांवर त्यांच्या क्षेत्रफळानुसार विविध प्रकारच्या घनकचरा प्रक्रिया सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. यामध्ये कचऱ्याचे वर्गीकरण व पुनर्वापर, ऊर्जा निर्मिती, जैविक कचऱ्यापासून बायोगॅस व बायोफ्युएल निर्मिती तसेच प्लास्टिक कचऱ्यापासून विविध उत्पादने तयार करण्याच्या सुविधांचा समावेश असेल.

सदर जागांची तांत्रिक योग्यता, उपलब्ध क्षेत्रफळ, वाहतूक व्यवस्था, पर्यावरणीय बाबी आणि इतर आवश्यक निकषांची तपासणी सुरू आहे. संबंधित सर्व बाबींचा अभ्यास करून तसेच आवश्यक त्या संमती व मान्यता प्राप्त करून अंतिम जागा निश्चित करण्यात येणार आहेत. या विकेंद्रित व्यवस्थेमुळे कचऱ्याची वाहतूक अधिक कार्यक्षम होण्यास, मोशी कचरा डेपोवरील भार कमी करण्यास तसेच शहरातील घनकचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया व विल्हेवाट लावण्यास मदत होणार आहे.



“ प्रस्तावित जागांच्या क्षेत्रफळानुसार तेथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दुर्गंधिविरहित ट्रान्स्फर स्टेशन, मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (MRF), बायोगॅस, बायोफ्युएल तसेच प्लास्टिकपासून उपयुक्त उत्पादने तयार करण्यासंदर्भातील विविध प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. प्रत्येक जागेची तांत्रिक व व्यवहार्यता तपासणी सुरू असून सर्व संबंधित बाबींचा विचार करून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

- विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### प्रस्तावित जागा

प्रभाग क्रमांक १३ मधील सेक्टर क्रमांक २२ येथे पाण्याच्या टाकीजवळ, प्रभाग क्रमांक १७ चिंचवड येथील आरक्षण क्र. १/८९ मधील सर्व्हे नं. ११३, ११४ व ११६ पैकी जागा, प्रभाग क्रमांक १८ चिंचवड येथील आरक्षण क्र. २२१, प्रभाग क्रमांक १० दत्तनगर येथील राम मंदिराजवळील जागा, सर्व्हे नं. ७७ दिघी गायरान, चोविसावाडी आरक्षण क्र. २/१६, पुनावळे येथील सर्व्हे नं. २३/६/३ पै., २३/६/२ पै., २३/५ पै., २३/१ पै., २३/६/४ पै., २३/२/१ पै. व २३/२/२, तसेच पुनावळे येथील सर्व्हे नं. २६/१/६, २६/३/१ व २६/३/२ पै. या जागांचा समावेश आहे. याशिवाय गवळीमाथा आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील जागेबाबतही सकारात्मक चर्चा सुरू आहे.

“ पिंपरी चिंचवड शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी विकेंद्रीकरणावर भर देण्यात येत आहे. मोशी डेपोवरील कचऱ्याचा भार कमी करण्यासोबतच कचऱ्याचे संकलन, वाहतूक, वर्गीकरण आणि प्रक्रिया अधिक कार्यक्षम पद्धतीने करण्याचे नियोजन आहे. प्रस्तावित जागांची तांत्रिकदृष्ट्या तपासणी करून या जागांची अंतिम निश्चिती महापौर, सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व नगरसदस्य यांच्या संमतीने केली जाणार आहे. पर्यावरणपूरक आणि नागरिकांना कमीत कमी त्रास होईल, अशा पद्धतीने या प्रकल्पांची उभारणी करण्यात येईल.

- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पिंपरी-चिंचवड! चिखलीत तरुणावर गोळीबार, दोघे अटकेत



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आर्थिक देवाण-घेवाणीच्या कारणावरून झालेल्या वादानंतर तरुणावर गोळी झाडण्यात आली. यामध्ये जखमी झालेल्या तरुणावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना सोमवारी मध्यरात्री अडीचच्या सुमारास जाधववाडी, चिखली येथे घडली.**

याप्रकरणी स्वप्नील कांताराम जाधव (वय ३७), रोशन पिंगळे ( वय २८, दोघे रा. मधला पेठ, जाधववाडी, चिखली) या दोघांना अटक केली आहे. रवी धनाजी घोगरे (वय २६,रा. जांभुळकर चौक, जाधववाडी, चिखली) असे गोळीबारात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

चिखली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत जाधव यांनी याबाबत माहिती दिली. रवी आणि स्वप्नील दोघे मित्र आहेत. रवी सोमवारी मध्यरात्री जाधववाडी येथे आला होता. तिथे स्वप्नील आणि त्याचा चालक रोशन उपस्थित होते. जुन्या आर्थिक देवाण-घेवाणीच्या कारणावरून रवी आणि स्वप्नील यांच्यामध्ये वाद झाला. या वादातून स्वप्नील याने ‘तुला आज जिवंत सोडत नाही’ अशा धमकी देऊन रवीच्या दिशेने पिस्तुलातून गोळी झाडली. ही गोळी रवीच्या पोटाला लागली. गोळी पोटात अडकली होती. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस निरीक्षक (गुन्हे) अमोल फडतरे तपास करीत आहेत.

### जिवे मारण्याची धमकी देत गोळीबार

जुन्या आर्थिक देवाण-घेवाणीच्या कारणावरून रवी घोगरे आणि स्वप्नील जाधव यांच्यात वाद झाला. वाद वाढल्यानंतर स्वप्नीलने रवीला जिवे मारण्याची धमकी देत पिस्तुलातून गोळी झाडली. गोळी रवीच्या पोटाला लागून आत अडकली. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती स्थिर आहे.

### गोळी पोटात अडकली

गोळी रवी घोगरे यांच्या पोटाला लागून आत अडकली. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांकडून उपचार सुरू असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### चिखली पोलिसांकडून दोघांना अटक

जाधववाडी येथे मध्यरात्री घडलेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर चिखली पोलिसांनी स्वप्नील जाधव आणि रोशन पिंगळे या दोघांना अटक केली. रोशन हा स्वप्नीलचा चालक असल्याचे पोलिसांनी सांगितले. आर्थिक व्यवहाराच्या वादातून गोळीबार झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून पोलीस निरीक्षक (गुन्हे) अमोल फडतरे पुढील तपास करीत आहेत.



## भूमिका

**गणराया, तुझ्या आगमनाने महाराष्ट्राच्या घराघरांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आरास सजली, मोदकांचा सुगंध दरवळला आणि 'सुखकर्ता दुःखहर्ता'च्या जयघोषाने वातावरण भारावून गेले. मात्र, यंदा तुझ्या स्वागतासोबत महाराष्ट्राच्या मनात अनेक चिंता आहेत. म्हणूनच यंदाची प्रार्थना केवळ सुख-समृद्धीची नाही, तर राज्यासमोरील विघ्ने दूर करण्याची आहे.**

# गणराया, सुखकर्ता हो आणि महाराष्ट्राचे दुःख हर!



पावसाने यंदा राज्यात विचित्र चित्र उभे केले आहे. काही भागांत अतिवृष्टीने नुकसान झाले, तर अनेक ठिकाणी पावसाने दडी मारल्याने पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. पेरणी झाल्यानंतर पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पुन्हा आभाळाकडे पाहण्याची वेळ आली आहे. अशा वेळी गणराया, पाऊस पाडणे शासनाच्या हातात नसले तरी संकटग्रस्त शेतकऱ्याला मदत करणे नक्कीच शासनाच्या हातात आहे. नुकसानीचे तातडीने पंचनामे, पीकविम्याची भरपाई, कर्जवसुलीला स्थगिती, चाऱ्याची उपलब्धता आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन याबाबत सरकारने संवेदनशीलता दाखवावी, एवढीच अपेक्षा.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांबरोबरच शहरांनाही समस्यांनी वेढले आहे. बेरोजगारीमुळे तरुणांच्या मनात अस्वस्थता आहे. स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी आणि प्रशासकीय गोंधळामुळे मेहनती विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत होत आहे. महागाईने सामान्य कुटुंबाचे आर्थिक गणित बिघडवले आहे. महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. खड्डेमय रस्ते आणि वाहतूक कोंडीने नागरिकांचे जगणे त्रस्त झाले आहे. या प्रश्नांवर केवळ आश्वासने नकोत; ठोस कृती हवी.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सामाजिक एकोप्याचे प्रतीक आहे. मात्र, भक्तीच्या नावाखाली वाढणारा कर्णकर्कश दणदणाट, अशोभनीय गाणी, बेफाम नाच आणि तासनतास वाहतूक रोखणे यामुळे उत्सवाचे मूळ स्वरूपच कुठेतरी हरवत आहे. डीजेचा आवाज वाढवणे म्हणजे भक्तीची उंची वाढवणे नव्हे. वृद्ध, रुग्ण, विद्यार्थी आणि लहान मुलांचा विचार करून उत्सव साजरा करणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्याचे धैर्य प्रशासनानेही दाखवले पाहिजे.

गणराया, यंदा तुझ्याकडे म्हणूनच एकच मागणे आहे—महाराष्ट्राला केवळ उत्सवाचा आनंद नको, तर विवेक, शिस्त आणि संवेदनशीलताही दे. राज्यकर्त्यांना जनतेच्या वेदना समजण्याची बुद्धी दे, प्रशासनाला कर्तव्याची जाणीव दे आणि समाजाला संयम दे. तुझ्या आगमनाने घरातील अंधार दूर होतो; यंदा महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील अंधारही दूर होऊ दे. संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या शिवाराला पाणी मिळू दे, तरुणांच्या हाताला काम मिळू दे आणि सामान्यांच्या जगण्यात दिलासा मिळू दे. विघ्नहर्त्या, यंदा खरंच धाव रे!

## प्रासंगिक »

### हुशार मुंगी

**एका जंगलात एक मुंगी राहत होती. ती खूप कष्टाळू होती. पावसाळा जवळ आला की ती रोज अन्नाचे दाणे गोळा करून बिळात साठवत असे. तिच्या शेजारी एक टोळ राहत होता. तो दिवसभर गाणी म्हणत फिरायचा आणि मुंगीची चेष्टा करायचा.**

तो म्हणायचा, "इतकी धावपळ कशासाठी? पाऊस आला की पाहू!"मुं-गी मात्र आपले काम करत राहिली. काही दिवसांनी जोरदार पाऊस सुरू झाला.

जंगलात सर्वत्र पाणी साचले. टोळाला अन्न मिळेनासे झाले. उपाशीपोटी तो मुंगीकडे गेला आणि मदत मागितली. मुंगीने त्याला अन्न दिले आणि म्हणाली, "संकट येण्यापूर्वी केलेली तयारीच खऱ्या अर्थाने उपयोगी पडते." टोळाला आपली चूक समजली. पाऊस थांबल्यानंतर त्याने मुंगीसोबत काम करण्यास सुरुवात केली.

पुढच्या वर्षी त्यानेही भरपूर अन्न साठवले. आता तो वेळ वाया घालवत नसे. जंगलातील इतर प्राण्यांनाही त्याने मेहनत आणि नियोजनाचे महत्त्व सांगितले.

- तात्पर्य : **योग्य वेळी केलेली मेहनत संकटात आधार देते.**

आंतरराष्ट्रीय परिषदांचे यश नेमके कशात मोजायचे, हा प्रश्न कायमच अनुत्तरित राहतो. उद्दिष्ट स्पष्ट नसेल, तर जे काही हाती लागेल त्यालाच मोठे यश मानून त्याचा गवगवा करण्याची सोय असते.

# 'ब्रिक्स'ची भव्यता आणि भारताचे वास्तव



दिल्लीतील अलीकडील 'ब्रिक्स' परिषद त्याचे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांची ही संघटना. पुढे अन्य काही देशांनाही सहभागी करून घेण्यात आले. मात्र, या संघटनेतील देशांचे परस्पर हितसंबंध, आर्थिक क्षमता आणि जागतिक राजकारणातील भूमिका परस्परांपेक्षा भिन्न आहेत. त्यामुळे 'ब्रिक्स' नेमके कोणते पर्यायी जागतिक व्यासपीठ उभे करू पाहते, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. ब्रिक्समधील रशिया आणि चीन हे अमेरिकाविरोधी भूमिका घेताना दिसतात. परंतु प्रत्यक्षात दोन्ही देशांना अमेरिकेशी संबंध राखण्याची तितकीच गरज आहे. चीनला अमेरिकेशी आर्थिक स्पर्धा करायची असली, तरी तैवानसारख्या प्रश्नांवर अमेरिकेचा थेट विरोध टाळणे त्याच्यासाठी महत्त्वाचे आहे. दुसरीकडे, इराणसारख्या देशाचा सहभाग अमेरिकाविरोधी सूर अधिक ठळक करतो; तर संयुक्त अरब अमिरातीसारख्या अमेरिकेशी जवळीक असलेल्या देशाचा सहभाग या समीकरणातील विसंगती अधोरेखित करतो.

या परिषदेत दोन मागण्या विशेष चर्चेत राहिल्या. पहिली म्हणजे ब्रिक्स देशांनी परस्पर व्यापारासाठी सीमा अधिक खुल्या कराव्यात आणि दुसरी म्हणजे अमेरिकी डॉलरला पर्यायी आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था उभी करावी. दोन्ही मागण्या ऐकायला आकर्षक असल्या तरी भारताच्या हिताच्या कसोटीवर त्यांचा विचार करणे आवश्यक आहे. डॉलरला पर्याय कोणता? चीनचे युआन की रशियाचे रूबल? भारतासाठी या दोन्हींपैकी कोणताही पर्याय अधिक फायदेशीर ठरेल, असे म्हणणे कठीण आहे. व्यापाराच्या बाबतीत तर भारताने अधिक सावध राहण्याची गरज आहे. चीनसोबतची प्रचंड व्यापारतूट आणि भारतीय बाजारपेठेतील चिनी वस्तूंचा वाढता प्रभाव लक्षात घेता, सीमा व्यापारासाठी पूर्णपणे खुल्या करण्याची घाई आत्मघातकी ठरू शकते.

भारतीय उद्योग चीनच्या स्पर्धेला समर्थपणे तोंड देण्याइतका सक्षम होईपर्यंत व्यापारावरील संरक्षणात्मक उपाय आवश्यकच आहेत. ब्रिक्सच्या शेकडो कलमी निवेदनापेक्षा या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देणे अधिक गरजेचे आहे. परिषदांमध्ये नेते एकत्र येतात, छायाचित्रे काढली जातात, संयुक्त निवेदने प्रसिद्ध होतात आणि त्यानंतर त्याचे यश साजरे केले जाते. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'सौभद्र'मधील 'मिळतिल बहु भूपाल अमित' ही ओळ अशा सोहळ्यांना अगदी चपखल लागू पडते. फरक एवढाच की आज अशी 'मौज' वारंवार होते; पण त्यातून भारताच्या पदरात नेमके काय पडते, हा प्रश्न मात्र अनुत्तरितच राहतो.

## ।। अभंगवाणी ।।



बोलायाचा त्यासीं ।
नको संबंध मानसीं ॥१॥

जया घडली संतनिंदा ।
तुज विसरूनि गोविंदा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भाजपाच्या आमदाराने रस्त्यावरच मागितली भीक

## मुंबई पोलिसांकडून आझाद मैदानावरील आंदोलनाला सलग दुसऱ्यांदा परवानगी नकार

**महाईन्यूज । मुंबई**

**भाजपाचे आमदार पराग शाह यांचा घाटकोपर परिसरात भिकाऱ्याच्या वेशात रस्त्यावर फिरतानाचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे. पैसा आणि पद नसताना लोक कशा पद्धतीने वागतात, हे जाणून घेण्यासाठी आपण हा प्रयोग केल्याचे शाह यांनी स्पष्ट केले.**





भिकाऱ्याच्या वेशात असताना अनेकांनी आपल्याला ओळखले नाही. काहींनी पैसे, तर काहींनी खाण्याचे पदार्थ दिल्याचे शाह यांनी सांगितले. गुरुंच्या आदेशानंतर हा प्रयोग केल्याचे सांगताना, 'लोक तुमच्या रूपाला ओळखतात, तुम्हाला नाही,' असा संदेश या प्रयोगातून मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यासाठी मागितलेल्या परवानगीला पोलिसांनी सलग दुसऱ्यांदा नकार दिला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी पहिला अर्ज नाकारल्यानंतर जरांगे यांच्या सहकाऱ्यांनी पुन्हा अर्ज केला होता.

दुसऱ्या अर्जात मर्यादित संख्येतील लोकांच्या उपस्थितीत आंदोलन करण्याची परवानगी मागण्यात आली होती. मात्र, पोलिसांनी दुसऱ्यांदाही परवानगी नाकारल्याने जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. आता जरांगे पाटील पुढील भूमिका काय घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

### भिकाऱ्याच्या वेशात आमदारांचा प्रयोग

भाजप आमदार पराग शाह यांचा घाटकोपरमध्ये भिकाऱ्याच्या वेशात फिरतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला. पैसा आणि पद नसताना लोक कसा मान देतात, हे जाणून घेण्यासाठी हे जाणून घेण्यासाठी गुरुंच्या आदेशानंतर हा प्रयोग केल्याचे शाह यांनी सांगितले.

### जरांगे यांच्या आंदोलनाला पुन्हा नकार

मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानावरील आंदोलनाला मुंबई पोलिसांनी सलग दुसऱ्यांदा परवानगी नाकारली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पहिला अर्ज नाकारल्यानंतर मर्यादित लोकांच्या उपस्थितीत आंदोलनासाठी पुन्हा अर्ज करण्यात आला होता.

# नागपूर कराराला पुन्हा हरताळ; हिवाळी अधिवेशन दोनच आठवडे!



**महाईन्यूज । नागपूर**

**महाराष्ट्राच्या निर्मितीवेळी झालेल्या नागपूर करारानुसार राज्याचे एक अधिवेशन नागपुरात घेण्याची तरतूद करण्यात आली होती. हे अधिवेशन सहा आठवड्यांचे असावे, अशी अपेक्षा असताना गेल्या काही वर्षांत अधिवेशनाचा कालावधी सातत्याने कमी होत आहे. यंदाचे नागपुरातील हिवाळी अधिवेशनही अवघ्या दोन आठवड्यांचे ठेवण्यात आल्याने नागपूर कराराच्या अंमलबजावणीवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

संसदीय कार्य विभागाने हिवाळी अधिवेशनाची तात्पुरती दिनदर्शिका निश्चित केली आहे. त्यानुसार ७ डिसेंबरपासून अधिवेशनाचे कामकाज सुरू होणार असून १८ डिसेंबरला त्याची सांगता होणार आहे. पहिल्या दिवशी अध्यादेश पटलावर ठेवण्यासह पुरवणी मागण्या सादर केल्या जाणार आहेत. शेवटच्या दिवशी शासकीय आणि अशासकीय कामकाज होणार आहे.

अधिवेशनाचा कालावधी कमी असल्याने विदर्भातील प्रलंबित प्रश्न, विकासकामे आणि स्थानिक समस्यांवर कितपत चर्चा होणार, याकडे लक्ष लागले आहे. दरवर्षी सत्ताधारी पक्षाकडून दोन किंवा तीन आठवड्यांचे कामकाज निश्चित केले जाते, तर विरोधक नागपूर कराराचा दाखला देत अधिवेशनाचा कालावधी वाढविण्याची मागणी करतात. मात्र, सत्तांतरानंतर भूमिकेत फारसा फरक पडत नसल्याचे चित्र आहे.

विधानभवनाच्या नव्या इमारतीचे काम सुरू असल्याने यंदाचे अधिवेशन नागपुरात होणार की नाही, याबाबत सुरुवातीला चर्चा होती. मात्र, आता ७ डिसेंबरपासून नागपुरातच अधिवेशन घेण्याचे निश्चित झाले आहे. मागील अधिवेशनात कोटेशनच्या आधारे करण्यात आलेल्या कामांबाबतही प्रश्न उपस्थित झाले होते. काही कामे प्रत्यक्षात न झाल्याचा, तर निविदा प्रक्रिया टाळण्यासाठी काही कामांचे तुकडे केल्याचा आरोप करण्यात आला होता. आमदार विकास ठाकरे यांच्या तक्रारीनंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी चौकशीचे आदेश दिले होते. मात्र, या प्रकरणाची चौकशी अद्याप पूर्ण झालेली नसल्याचे समोर आले आहे.

### मागील अधिवेशनातील कामाच्या चौकशीचे काय?

मागील अधिवेशनात 'कोटेशन'च्या आधारे मोठ्या प्रमाणात कामे करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात काम करण्यात आले नाही. तर काही प्रकरणात निविदा टाळण्यासाठी कामांचे तुकडे करण्यात आले. आमदार विकास ठाकरे यांच्या तक्रारीवरून सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी चौकशीचे आदेश दिले होते. परंतु अद्याप या प्रकरणाची चौकशीच करण्यात आली नसल्याचे समजते.

### ८६ कोटींच्या खर्चाचा आराखडा

हिवाळी अधिवेशनाच्या तयारीला सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरुवात केली आहे. विधानभवन, रविभवन, नागभवन, रामगिरी, देवगिरी, विजयगड, आमदार निवास आणि १६० गाळ्यांसह विविध ठिकाणच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी सुमारे ८६ कोटी रुपयांचा खर्चाचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

### दोन आठवड्याचे कामकाज

संसदीय कार्य विभागाकडून दोन आठवड्यांच्या कामकाजाची तात्पुरती दिनदर्शिकाही निश्चित केली आहे. यानुसार पहिल्या दिवशी म्हणजे ७ डिसेंबरला अध्यादेश पटलावर ठेवण्यात येणार असून पुरवणी मागण्याही सादर करण्यात येतील. तर शेवटच्या दिवशी म्हणजे १८ डिसेंबरला शासकीय व अशासकीय कामकाज होईल. या दोन आठवड्यांच्या कामकाजात विदर्भातील किती प्रश्नांना न्याय मिळेल, हे अधिवेशन संपल्यावरच दिसून येईल.

# लंडनच्या थेम्स नदीवर भव्य ‘गंगा आरती’

## वाराणसी घाटांसारखी अभूतपूर्व झलक, शेकडो भाविक सहभागी

**महाईन्यूज । लंडन**

**लंडनमध्ये रविवारी एक आगळं-वेगळं दृष्य पाहायला मिळालं आहे. लंडनमधील थेम्स नदीवर पहिल्यांदाच गंगा आरतीचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमामध्ये शेकडो नागरिक सहभागी झाले होते. त्यामुळे भारतातील वाराणसीच्या घाटांसारखं दृश्य पहिल्यांदाच लंडनमधील थेम्स नदीवर पाहायला मिळालं आहे. या कार्यक्रमाचा व्हिडीओ देखील आता समोर आला आहे.**



‘चिन्मय मिशन यूके आणि टोटली थेम्स फेस्टिव्हल’ यांच्या संयुक्त विद्यमाने थेम्स नदीच्या काठावर पहिल्यांदाच ‘गंगा आरती’चा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात हजारो लोकांनी सहभाग घेतला होता. ‘चिन्मय मिशन यूके’ला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

थेम्स नदीच्या काठावर झालेल्या गंगा आरतीच्या कार्यक्रमाला ‘गंगा आरती ऑन द थेम्स : अ सेलिब्रेशन ऑफ लाईट’ असं नाव देण्यात आलं होतं. या संस्थेच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाले आहेत, त्यानिमित्ताने जगभरात सुरू असलेल्या विविध कार्यक्रमांचाच एक भाग म्हणून हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

“पिढ्यानपिढ्या लोक गंगा नदीच्या काठावर एकत्र येऊन नदी, निसर्ग आणि आपलं जीवन टिकवून ठेवणाऱ्या सर्व गोष्टींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ज्योत अर्पण करतात. थेम्स नदीवरील गंगा आरतीमध्येही तीच भावना आहे. हा कार्यक्रम लोकांना कृतज्ञता, आशा आणि एकतेच्या एका सामायिक क्षणासाठी एकत्र आणतो. चिन्मय मिशनसाठी गंगा नदी ही ज्ञानाच्या प्रवाहाचेही प्रतीक आहे”, असं ‘चिन्मय मिशन यूके’च्या निवासी शिक्षिका श्रीप्रिया चैतन्य यांनी सांगितलं.

आरती हा कृतज्ञता व्यक्त करणारा एक पारंपरिक हिंदू विधी आहे. ज्यामध्ये मोठे दिवे, प्रार्थना, संगीत आणि मंत्रोच्चार यांचा समावेश असतो. हा विधी नदीबद्दलची आदरभावना आणि निसर्गमातेबद्दलची व्यापक कृतज्ञता व्यक्त करतो. हिंदू परंपरेत गंगेला पवित्र, जीवनदायिनी आणि जीवनाचे पोषण करणारी मानून तिचा सन्मान केला जातो”, असंही चिन्मय मिशन यूकेच्या प्रवक्त्याने सांगितलं.

दरम्यान, थेम्स नदीच्या काठावर झालेला हा कार्यक्रम पूर्णपणे जमिनीवर पार पडला. या कार्यक्रमातील कोणतीही गोष्ट नदीत टाकली नाही किंवा सोडली गेली नाही. “विधीसाठी वापरले जाणारे दिवे पाण्यात सोडण्याऐवजी नदीकाठावरच ठेवले जातील, त्यामुळे परंपरेचा सन्मान राखला जाईल आणि थेम्स नदीच्या नैसर्गिक स्थितीत कोणताही व्यत्यय येणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे”, असं चिन्मय मिशन यूकेच्या प्रवक्त्याने सांगितलं.

# TMCचे १७ बंडखोर खासदार भाजपच्या वाटेवर? खासदार जगदीश बसुनियांचा दावा

**महाईन्यूज । पश्चिम बंगाल**

**पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचा पराभव झाला. या पराभवानंतर पक्षात उभी फूट पडली. विधानसभा आणि संसदेत देखील पक्षात फूट पडली. विधानसभेत आमदारांना वेगळा गट स्थापन केला तर, २० खासदारांनी जूनमध्ये फारशा परिचित नसलेल्या नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडियामध्ये प्रवेश केला. यानंतर आता या २० बंडखोर खासदारांपैकी एक असलेल्या जगदीश चंद्र बर्मा बसुनिया यांनी त्यांच्यापैकी १७ जण ऑक्टोबरमध्ये भाजपात प्रवेश करणार असल्याचे म्हटले आहे. दुर्गापूजेपूर्वीच हा पक्षप्रवेश होईल असेही बसुनिया यांनी म्हटले आहे.**



“सुरुवातीलाच थेट भाजपात प्रवेश करण्याचा प्लॅन होता असेही बसुनिया म्हणाले. सुरुवातीला थेट भाजपमध्ये सामील होण्याची योजना होती, परंतु अबू ताहेर आणि इतर दोन खासदारांच्या आक्षेपांमुळे ते शक्य झाले नाही. त्यामुळे एनसीपीआयमध्ये प्रवेश केला”, असे बसुनिया म्हणाले. एनसीपीआय हा एक अमान्यताप्राप्त पक्ष आहे, पक्षाने त्रिपुरामध्ये विधानसभेच्या दोन जागांवर निवडणूक लढवली होती. एनसीपीआयबद्दल काहीच माहिती नव्हती असेही बसुनिया म्हटले आहे.

जगदीश चंद्र बर्मा बसुनिया कूचबिहारचे प्रतिनिधित्व करतात. “एनसीपीआयचे १७ खासदार भाजपामध्ये सामील होतील. इतर जे करतील, त्याचे मलाही अनुसरण करावे लागेल,” असे बसुनिया म्हणाले. पश्चिम बंगालच्या मुस्लिमबहुल मुर्शिदाबाद जिल्ह्यातील तीन मतदारसंघांचे प्रतिनिधित्व करणारे खान, खलीलुर रहमान आणि युसूफ पठाण हे सत्ताधारी गटाचा घटक असलेल्या एनसीपीआयमध्ये सामील झाले असले तरी, आतापर्यंत भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बैठकांपासून दूर राहिले आहेत.

बसुनिया यांनी भाजपात प्रवेशाचे संकेत दिल्यानंतर आता फुटीर गटाचे खासदारही प्रतिक्रिया देऊ लागले आहेत. “बसुनिया यांना आमच्या वतीने बोलण्याचा कोणीही अधिकार दिलेला नाही. अनेकवेळा सांगितलंय आम्ही भाजपात जाणार नाही”, असे खान म्हणाले. शताब्दी रॉय यांनी देखील बसुनिया यांच्या अशा कोणत्याही वक्तव्याची कल्पना नसल्याचे स्पष्ट केले. असा काही निर्णय झाल्याचे मला माहिती नाही, असे रॉय म्हणाल्या. अरुप चक्रवर्ती यांनी देखील अशाप्रकारच्या निर्णयाची कल्पना नसल्याचे सांगितले.

### भाजपकडून शक्यता कायम

पश्चिम बंगाल भाजपाचे प्रदेशाध्यक्ष सामिक भट्टाचार्य यांनी फुटीर खासदारांच्या प्रवेशावर स्पष्ट भाष्य केले नाही मात्र, शक्यताही नाकारली नाही. “कोणालाही भाजपात प्रवेश करायचा असेल. पण त्यांच्या प्रवेशाचा निर्णय सर्वोच्च स्तरावर घेतला जातो,” असे भट्टाचार्य म्हणाले.



# एरिकाची हटके भूमिका

सुमारे ५ वर्षांनी अभिनेत्री एरिका फर्नांडिस टीव्हीवर पुनरागमन करत असून, ‘108 बेस हॉस्पिटल उरी’मध्ये ती डॉ. मेजर नैना सान्यालची भूमिका साकारत आहे. काश्मीरच्या नयनरम्य खोऱ्यांच्या पार्श्वभूमीवर या शोचे चित्रिकरण करण्यात आले आहे. युद्धभूमीऐवजी सैन्य रुग्णालयातील डॉक्टर आणि वैद्यकीय पथकाचे आयुष्य या मालिकेत दाखवण्यात आले आहे. संघर्षाच्या क्षेत्रातून आणलेल्या जखमी सैनिकांवर उपचार करताना डॉक्टरांना कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागते, हेही यात पाहायला मिळणार आहे. एरिकाला यापूर्वी सासू-सुनेच्या मालिकांच्या अनेक ऑफर्स मिळत होत्या; मात्र तिला अशा भूमिका करायच्या नव्हत्या. त्यामुळे ‘108 बेस हॉस्पिटल उरी’ची ऑफर मिळाल्यानंतर तिने ती स्वीकारली. या प्रोजेक्टच्या माध्यमातून काहीतरी वेगळे करण्याची संधी मिळेल, असे तिला वाटले. वैद्यकीय क्षेत्राबद्दल तिला आधीपासूनच उत्सुकता असल्याने या भूमिकेसाठी तिने विशेष तयारी केली. काश्मीरसह अनेक प्रत्यक्ष लोकेशन्सवर चित्रिकरण झाले आहे. शोमध्ये विविध वैद्यकीय प्रकरणे आणि सैन्य रुग्णालयातील आव्हाने दाखवण्यात आली आहेत. सैन्य डॉक्टरचा अनुभव सामान्य डॉक्टरांपेक्षा वेगळा असल्याचे एरिकाने सांगितले. या भूमिकेतून प्रेक्षकांना तिचा नवा अंदाज पाहायला मिळणार आहे.



# ‘स्टुडंट ऑफ द इयर 3’मध्ये शनाया?

करण जोहरच्या लोकप्रिय ‘स्टुडंट ऑफ द इयर’ फ्रँचायझीच्या तिसऱ्या भागाची अपडेट समोर आली आहे. बॉलिवूड हंगामाच्या रिपोर्टनुसार, 'स्टुडंट ऑफ द इयर 3' चित्रपटाऐवजी वेबसीरिजमध्ये बदलण्याची निर्मात्यांची योजना आहे. सिनेमाच्या तुलनेत या सीरिजची थीम पूर्णपणे वेगळा असण्याची शक्यता आहे. यात बॉलिवूड अभिनेत्री शनाया कपूर मुख्य भूमिकेत दिसू शकते. चित्रपटाच्या तुलनेत सीरिजची संकल्पना अगदी वेगळी असेल, ज्याचा टोन अत्यंत डार्क आणि बोल्ड असू शकतो. मात्र, या प्रोजेक्टबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. दरम्यान, २०१२ मध्ये सिद्धार्थ मल्होत्रा, वरुण धवन आणि आलिया भट्ट यांच्यासोबत निर्माता करण जोहर यांच्या ‘स्टुडंट ऑफ द इयर’ची सुरुवात झाली होती, जी बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरली. यानंतर २०१९ मध्ये याचा दुसरा भाग ‘स्टुडंट ऑफ द इयर २’ आला, ज्यामध्ये टायगर श्रॉफ, तारा सुतारिया आणि अनन्या पांडे यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. पण या चित्रपटाचा सिक्वल यशस्वी ठरला नाही. ‘स्टुडंट ऑफ द इयर २’च्या अपयशाचा विचार करूनच आता ‘स्टुडंट ऑफ द इयर ३’ वेब सीरिजच्या स्वरूपात सादर केली जाईल, असे मानले जात आहे.

# २ कोटींच्या बजेटचा ‘हनुमान अंश’ २०० कोटींच्या जवळ!

बाबा नीम करौली यांच्या जीवनावर आधारित ‘हनुमान अंश’ हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई करत आहे. विशेष म्हणजे रिलीजच्या पहिल्या काही आठवड्यांत फारशी कमाई न करणाऱ्या या चित्रपटाने नंतर अचानक वेग पकडला. आता रिलीजच्या ३७व्या दिवशीही चित्रपटाची कमाई सुरूच असून तो २०० कोटींच्या नेट कलेक्शनच्या जवळ पोहोचला आहे.

‘हनुमान अंश’ ७ ऑगस्ट रोजी प्रदर्शित झाला. चित्रपटाला सुरुवातीला प्रेक्षकांचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही. पहिल्या दिवशी चित्रपटाने केवळ १० लाख रुपयांची कमाई केली. पहिल्या आठवड्यातही चित्रपटाची कमाई साधारण १.०८ कोटी रुपये इतकीच होती. दुसऱ्या आठवड्यात तर चित्रपटाचे शोही कमी करण्यात आले. त्यावेळी चित्रपटाने केवळ ४० लाख रुपयांची कमाई केली. मात्र तिसऱ्या आठवड्यापासून चित्रपटाचं नशीब बदललं. चित्रपटाबद्दल प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळू लागला आणि त्याचा फायदा बॉक्स ऑफिसवर दिसून आला.

तिसऱ्या आठवड्यात चित्रपटाने तब्बल १०.४० कोटी रुपयांची कमाई केली. त्यानंतर कमाईचा वेग आणखी वाढत गेला. चौथ्या आठवड्यात चित्रपटाच्या कमाईने मोठी झेप घेतली. या काळात चित्रपटाने सुमारे ६१ कोटी रुपयांचा कलेक्शन केलं. पाचव्या आठवड्यात ही कमाई वाढून ९०.२५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. आता ३७व्या दिवशीही चित्रपटाला प्रेक्षकांचा प्रतिसाद



मिळत आहे.

सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार, ‘हनुमान अंश’ने रिलीजच्या ३७व्या दिवशी तब्बल १८.५० कोटी रुपयांची कमाई केली. या दिवशी चित्रपटाचे ७,४४९ शो होते आणि थिएटरमधील ऑक्युपन्सी जवळपास ५२ टक्के होती. या कमाईनंतर चित्रपटाचं नेट कलेक्शन २०० कोटींच्या अगदी जवळ पोहोचलं आहे. चित्रपटाने आतापर्यंत २२७ कोटी रुपयांचा ग्रॉस कलेक्शन केल्याचं सांगितलं जात आहे. परदेशातील बॉक्स ऑफिसवरही चित्रपटाची कमाई सुरू आहे. ३७व्या दिवशी ओव्हरसीज मार्केटमधून सुमारे ५ कोटी रुपये मिळाले. परदेशातील एकूण कमाई ९.५० कोटी रुपये झाली आहे. त्यामुळे चित्रपटाचा वर्ल्डवाइड कलेक्शन २३६.५० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. या चित्रपटाची सर्वात खास गोष्ट म्हणजे त्याचं बजेट. ‘हनुमान अंश’ हा चित्रपट केवळ २ कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झाल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळे चित्रपटाची आतापर्यंतची कमाई पाहता निर्मात्यांसाठी हा मोठा फायदा ठरला आहे.

‘हनुमान अंश’चं दिग्दर्शन विशाल चतुर्वेदी यांनी केलं आहे. हा चित्रपट लक्ष्मण दास यांच्या जीवनावर आधारित आहे. पुढे ते नीम करौली बाबा म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांच्या आध्यात्मिक प्रवासाची कहाणी या चित्रपटातून दाखवण्यात आली आहे. चित्रपटात शोभिनव सत्या यांनी नीम करौली बाबांची भूमिका साकारली आहे. त्यांच्यासोबत चंदन के आनंद, पूर्णिमा तिवारी आणि अनिल रस्तोगी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

# महिला संघानंही आशिया चषक नाकारला!

## मोहसीन नक्वींच्या हातून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार; BCCI ने सांगितले कारण

**महाईन्यूज । दुबई**

**महिला आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाने जेतेपदाचा मान पटकावला. अंतिम सामन्यात भारतीय संघाने श्रीलंकेवर विजयाची नोंद केली. पण पुन्हा एकदा ACC प्रमुख मोहसीन नक्वी यांच्या हातून ट्रॉफी घेण्यास नकार दिला. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात भारतीय पुरुष संघाने पाकिस्तानला हरवून आशिया चषक स्पर्धा जिंकली होती. त्यावेळी सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने देखील मोहसीन नक्वी यांच्या हातून ट्रॉफी घेण्यास नकार दिला होता. दरम्यान यावेळी भारतीय संघाने ही ट्रॉफी का नाकारली? यावर बीसीसीआयने काय स्पष्टीकरण दिलं?**





बीसीसीआय सचिव देवजीत सैकिया यांनी स्पोर्ट्स तकला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, “यामागे दुसरं काहीच कारण नाही. मी काहीच वेगळं बोलणार नाही. एप्रिल २०२५ मध्ये पहलगाममध्ये जे काही घडलं, त्यानंतर पाकिस्तानसोबतचे संबंध आणखी खराब झाले आहेत. आम्हाला पाकिस्तानसोबत कुठलाही सामना खेळायचा नव्हता. पण बीसीसीआयने सेंट्रल गव्हर्नमेंटच्या पॉलिसीचं पालन केलं आणि पाकिस्तानचा सामना करण्यासाठी मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला.

तसेच ते पुढे म्हणाले की, “ACC ची देखील एक जुनी पॉलिसी आहे. ती म्हणजे जो संघ आशिया चषक स्पर्धेची ट्रॉफी जिंकणार, त्या देशाचा सचिव किंवा अध्यक्ष ट्रॉफी द्यायला जाणार. हा एक अलिखित नियम होता. बांगलादेश किंवा श्रीलंकेचा संघ जिंकला होता, त्यावेळी जय शाह यांनी ट्रॉफी दिली नव्हती. पण गेल्यावेळी भारताने जेतेपदाची ट्रॉफी उंचावली, त्यावेळी या नियमाचं पालन केलं गेलं नाही. आशियाई क्रिकेट परिषदेचे प्रमुख मोहसीन नक्वी ट्रॉफी देण्यासाठी पुढे गेले. पण यावेळी काही कारणं आहेत, त्यामुळे आम्ही त्यांच्याकडून ट्रॉफी स्वीकार करणार नाही.”

तसेच ते पुढे म्हणाले की, “प्रत्येक भारतीय खेळाडू आणि देशवासीयांसाठी आधी देश खूप महत्वाचा आहे. संपूर्ण देशवासीयांना हेच वाटतं की, जो व्यक्ती आपल्या देशाविरुद्ध युद्ध पुकारण्याची भाषा करतो, त्याच्या हातून ट्रॉफी कशी घेणार? त्यामुळेच पुरुष संघ जिंकला तेव्हा आणि महिला संघ जिंकल्यानंतरही भारतीय संघाने ट्रॉफी घेण्यास नकार दिला आहे.”

# अफगाणिस्तानविरुद्ध अभिषेकचा धुमाकूळ; रोहितच्या विक्रमाची बरोबरी

**महाईन्यूज । दुबई**

**भारत आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये ३ टी-२० सामन्यांच्या मालिकेला सुरूवात झाली आहे. मालिकेतील पहिला सामना १३ सप्टेंबरला दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांअखेर ८ गडी बाद १५६ धावा केल्या होत्या. हे आव्हान भारतीय संघाने १४ व्या षटकात पूर्ण केलं. भारतीय संघाकडून अभिषेक शर्माने वादळी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने रोहित शर्माच्या मोठ्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे.**







भारताचा युवा सलामीवीर फलंदाज रोहित शर्मा आपल्या तुफान फटकेबाजीसाठी ओळखला जातो. अनेकदा त्याने पहिल्या चेंडूवर षटकार खेचला आहे. या सामन्यातही त्याने पहिल्या षटकांत षटकार खेचून सुरूवात केली. यादरम्यान टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिल्या डावात सर्वाधिक षटकार खेचण्याच्या रेकॉर्डमध्ये रोहित शर्माची बरोबरी केली आहे.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिल्या डावातील पहिल्या षटकात सर्वाधिक षटकार खेचणाऱ्या भारतीय फलंदाजाचा रेकॉर्ड हा आतापर्यंत रोहित शर्माच्या नावे होता. रोहितने ४०१ चेंडू खेळून १२ षटकार खेचले होते. आता अभिषेक शर्माने अवघ्या १५२ चेंडूंमध्ये रोहित शर्माच्या या मोठ्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. हे दोन्ही फलंदाज पहिल्या षटकांत सर्वाधिक षटकार खेचणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत पहिल्या आणि दुसऱ्या स्थानी आहेत. तर ८ षटकार खेचणारा इशान किशन या यादीत तिसऱ्या स्थानी आणि ७ षटकार खेचणारा संजू सॅमसन चौथ्या स्थानी आहे.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानने २० षटकांअखेर अवघ्या १५६ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाला सुरूवातीलाच मोठा धक्का बसला. कारण संजू सॅमसन अवघ्या १० धावा करून माघारी परतला. त्यानंतर इशान किशन आणि अभिषेक शर्माने मिळून भारतीय संघाचा डाव सावरला. अभिषेक शर्माने तुफान फटकेबाजी करत ३२ चेंडूंमध्ये ८२ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ७ चौकार आणि ७ षटकार खेचले. यादरम्यान त्याने २५६.२५ च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. अफगाणिस्तानच्या गोलंदाजांची धुलाई करत त्याने भारतीय संघाला एकतर्फी विजयाची नोंद करून दिली. या विजयासह भारतीय संघाने ३ टी-२० सामन्यांच्या मालिकेत १-०ने आघाडी घेतली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
दि. 15 सप्टेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताह

## महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली १५ सप्टेंबरला बैठक; नागरिकांच्या सूचनांना प्राधान्य

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मराठी भाषेला केंद्र शासनाने दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात भाषेचा दर्जा दिला. या ऐतिहासिक निर्णयाच्या पार्श्वभूमीवर दि. ३ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' आणि दि. ३ ते ९ ऑक्टोबर हा कालावधी 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' म्हणून साजरा करण्याचे राज्य शासनाने निर्देश दिले आहेत. या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सर्वव्यापी विविध कार्यक्रम  उपक्रम आयोजित करण्याचे प्रयोजन असून त्यासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या विशेष उपस्थितीत मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे.**






महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात होणाऱ्या या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्राचा समृद्ध भाषिक व सांस्कृतिक वारसा अधिक वृद्धिंगत करण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यादृष्टीने मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार व प्रसार करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात. राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने दि. ३ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' आणि दि. ३ ते ९ ऑक्टोबर हा कालावधी 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' म्हणून व्यापक स्वरुपात साजरा करण्यासाठी महापालिकेच्यावतीने विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबविण्याचे प्रयोजन आहे.

या उपक्रमांचे स्वरूप, रूपरेषा, व्याप्ती आणि विविध कार्यक्रमांबाबत सर्वंकष चर्चा करण्यासाठी नियोजन बैठक घेण्यात येणार आहे.

या बैठकीस मराठी भाषेवर प्रेम करणारे साहित्यिक, मराठी भाषा संवर्धक, मराठी भाषा प्रचारक, मराठी भाषेचे जतन संवर्धन करणाऱ्या कला, साहित्य व सांस्कृतिकसह सर्व क्षेत्रातील विविध संस्था, व्यक्ती व प्रतिनिधींनी या बैठकीस उपस्थित राहून आपल्या सूचना व संकल्पना मांडाव्यात, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

अभिजात मराठी भाषा दिवस व सप्ताह शहरात व्यापक स्वरूपात साजरा करून मराठी भाषेचा समृद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासह मराठी भाषेच्या प्रचार, प्रसार व संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी दिली आहे.

# शालेय जिल्हास्तरीय वुशू स्पर्धेत राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे निर्विवाद वर्चस्व

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**वाकड येथील कावेरी नगर क्रीडा संकुलात नुकत्याच पार पडलेल्या शालेय जिल्हास्तरीय वुशू क्रीडा स्पर्धेत राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या (लांडेवाडी, भोसरी) खेळाडूंनी देदीप्यमान यश संपादन केले आहे. १७ आणि १९ वर्षाखालील मुला-मुलींच्या विविध वजन गटांत चमकदार कामगिरी करत या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १४ सुवर्ण, ३ रौप्य आणि २ कांस्य अशा एकूण १९ पदकांवर नाव कोरले. या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणाऱ्या सर्व १४ खेळाडूंची जामखेड (जि. अहिल्यानगर) येथे होणाऱ्या शालेय विभागस्तरीय वुशू स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**








## यशस्वी खेळाडूंचा निकाल:

**१९ वर्षांखालील मुले:**

प्रथम क्रमांक (सुवर्णपदक): आदित्य चव्हाण (-४८ किलो), कार्तिक जगताप (-५२ किलो), सुमित कांबळे (-५६ किलो), सदन अन्सारी (-६० किलो), शुभम जाधव (-७० किलो), पार्थ तांबेरे (-८० किलो), निश्चय जिनवाल (-८५ किलो).

द्वितीय क्रमांक (रौप्यपदक): कार्तिक काळे (-८० किलो).

तृतीय क्रमांक (कांस्यपदक): विनीत नाईक (-४५ किलो).

**१७ वर्षांखालील मुले:**

प्रथम क्रमांक (सुवर्णपदक): दिवाकर पांडे (-४८ किलो), साईराज हळीकर (-५२ किलो), अमित माने (-६० किलो), सारांश केंगार (-८० किलो).

द्वितीय क्रमांक (रौप्यपदक): शंभूराजे क्षीरसागर (-६५ किलो).

तृतीय क्रमांक (कांस्यपदक): आदित्य शिंदे (-७५ किलो).

**१९ वर्षांखालील मुली:**

प्रथम क्रमांक (सुवर्णपदक): प्राची वाघमोडे (-५२ किलो), चैत्राली लांडगे (-७० किलो), दीक्षा शेलार (-६० किलो).

तृतीय क्रमांक (कांस्यपदक): दिव्या जगताप (-४५ किलो).

प्रथम क्रमांक मिळवलेले हे १४ खेळाडू आता २२ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जामखेड येथे होणाऱ्या विभागस्तरीय स्पर्धेत पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या सर्व खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. गतवर्षीही या कनिष्ठ महाविद्यालयाच्या चार खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते.

खेळाडूंच्या या ऐतिहासिक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरीचे प्रथम आमदार विलासराव लांडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, सचिव सुधीर मुंगसे, विश्वस्त विक्रम लांडे, प्राचार्य डॉ. के. जी. कानडे, उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्या डॉ. नेहा बोरसे, रजिस्ट्रार अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा. योगिता बारवकर, प्रा. संगीता गवस यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळात गणरायाची विधिवत प्राणप्रतिष्ठा

## पारंपरिक वाद्यांच्या गजरात बाप्पाचे आगमन; विलास लांडे यांच्या हस्ते आरती व पूजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या भोसरी आणि डुडुळगाव येथील दोन्ही शैक्षणिक संकुलांमध्ये श्री गणेश चतुर्थीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार श्री. विलास लांडे यांच्या शुभहस्ते श्री गणेशाची विधिवत प्राणप्रतिष्ठा व आरती करण्यात आली.**



या मंगलप्रसंगी बोलताना श्री. विलास लांडे यांनी उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांना गणेशोत्सवाच्या आणि गणेश चतुर्थीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. "गणपती बाप्पा ही बुद्धी आणि मंगलतेची देवता आहे. बाप्पाच्या आशीर्वादाने सर्व विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्य, उज्वल भविष्य आणि यशाची प्राप्ती होवो," अशी प्रार्थना त्यांनी या वेळी केली. तसेच संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे योगदान कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

भोसरी व डुडुळगाव येथील दोन्ही संकुलांत सकाळी पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात श्रींची मूर्ती स्थापन करण्यात आली. संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने आणि आकर्षक सजावटीने उजळून निघाला होता. या सोहळ्यास संस्थेचे पदाधिकारी, विविध विभागांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरतीनंतर सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

> गणपती बाप्पा ही बुद्धी, ज्ञान आणि मंगलतेची देवता आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या भोसरी आणि डुडुळगाव दोन्ही संकुलांत बाप्पाचे आगमन अत्यंत उत्साहात व भक्तीमय वातावरणात झाले आहे. श्री गणरायाच्या कृपेने आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्य, उज्वल भविष्य आणि यशाची शिखरे गाठण्याची शक्ती मिळो, हीच बाप्पाच्या चरणी प्रार्थना. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना उत्तम सुविधा देण्यासाठी आमची संस्था सदैव कटिबद्ध आहे. संस्थेच्या या यशस्वी प्रवासात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. या पवित्र गणेशोत्सवाच्या निमित्ताने मी जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या संपूर्ण परिवाराला आणि सर्व नागरिकांना गणेश चतुर्थीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो.
>
> - विलास लांडे, संस्थापक अध्यक्ष, राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ.



# पुणे-मुंबई महामार्गावर ७९ लाखांचा गुटखा पकडला

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा आणि सुगंधी तंबाखूची आंतरराज्यीय वाहतूक करणाऱ्या टोळीवर शिरगाव-परंदवडी पोलिसांनी कारवाई केली. पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर करण्यात आलेल्या या कारवाईत राजनिगंधा गुटखा, सुगंधी तुळशी तंबाखू, वर्मी कंपोस्ट खत आणि अशोक लेलँड टेम्पोसह एकूण ७९ लाख ४६ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, १२ सप्टेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू होती. त्यावेळी पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जाणारा लाल रंगाचा अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो संशयास्पदरीत्या आढळला.

पोलिसांनी टेम्पो थांबवून तपासणी केली असता चालकाने वाहनात 'वर्मी कंपोस्ट खत' असल्याचे सांगितले. मात्र, पोलिसांना संशय आल्याने वाहनाची झडती घेतली असता पांढऱ्या रंगाच्या पोत्यांमध्ये मोठमोठे बॉक्स आढळून आले. तपासणीदरम्यान त्यामध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला राजनिगंधा गुटखा, तुळशी सुगंधी तंबाखू आणि अन्य तंबाखूजन्य पदार्थ आढळले.

पोलिसांनी अमजदुद्दीन ऐनुलहक चौधरी (रा. माखळी, बंगळुरू, कर्नाटक; मूळ रा. त्रिपुरा) या टेम्पोचालकाला अटक केली आहे. त्याच्याविरुद्ध शिरगाव-परंदवडी पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २६२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३, १२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये बाप्पाचे पारंपरिक वेषात अन् ढोल-ताशांच्या गजरात दिमागदार आगमन!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव येथे श्री गणरायाचे अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात आगमन झाले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शाळेत भव्य आगमन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाख परिधान करून ढोल-ताशांचा गजर, लेझिमचे प्रात्यक्षिक आणि हातात फडकणारे ध्वज यांसह संपूर्ण थेरगाव परिसर भक्तीमय अन् आनंदमयी करून सोडला.**



विद्यार्थ्यांच्या या ऊर्जेने आणि शिस्तीने उपस्थितांची मने जिंकली. शाळेच्या प्रांगणात विधिवत पूजा अर्चा करून श्री गणरायाची मूर्ती मंगलमय वातावरणात प्रतिष्ठापित करण्यात आली. या सोहळ्याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय पवार, खजिनदार सौ. सुरेखा पवार, मुख्याध्यापिका सौ. विद्या नाईक आणि सौ. नायगम अँग्रेस यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरती आणि प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

> शाळेत भारतीय संस्कृती आणि परंपरांची जपणूक व्हावी, तसेच विद्यार्थ्यांमध्ये संघभावना व उत्साहाचे वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने या गणेशोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि सहभाग खरोखरच कौतुकास्पद आहे.
>
> - विजय पवार, संस्था अध्यक्ष, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव संस्था.

DTE Code
6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**



Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507